# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक 2007/(322/07) विशि-4 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 (1994 चा महा. 35) च्या कलम 3 च्या पोटकलम (2) अन्वये दिनांक 27 सप्टेंबर, 2011 रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, 2016 (सन 2017 चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक 6) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (आस्थापना विभाग)

एम. आय. डी. सी. रोड कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली 442605
दुरध्वनी क्रमांक :- 07132-223104 E-mail :- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गों.वि./आस्था./3544 /2026 दिनांक:-22/10/2026

## परिपत्रक

***विषय:- दिनांक 25/10/2026(रवीवार) रोजी नियमीत कामकाज सुरू ठेवण्याबाबत.***

गोंडवाना विद्यापीठाच्या आस्थापनेवर कार्यरत सर्व सांविधानिक अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी, तसेच मानधन तत्त्वावर व बाह्यस्रोताद्वारे कार्यरत कर्मचारी यांना कळविण्यात येते की, दिनांक 03/11/2026 रोजी विद्यापीठाच्या अधिसभेची सभा आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेच्या अनुषंगाने दिनांक 23/10/2026 पर्यंत अधिसभा सदस्यांकडून प्रश्न व प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार, अधिसभा सदस्यांकडून प्राप्त झालेल्या व मा. कुलगुरू महोदयांनी ग्राह्य ठरविलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने उत्तरांचे मसुदे तयार करून त्यांचा अंतिम मसुदा मा. व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्याच्या दृष्टीने दिनांक 25/10/2026 (रविवार) रोजी विद्यापीठाचे नियमित कामकाज सुरू ठेवण्यात येत आहे.

तरी, सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी सदर दिवशी नियमित कामकाजासाठी उपस्थित राहून आपापल्या विभागातील कामकाज प्रचलित पद्धतीनुसार सुरू ठेवावे. सदर दिवशी उपस्थित राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदविण्यात यावी. तसेच, रविवारच्या दिवशी कामकाज केल्याबद्दल अनुज्ञेय असलेली प्रतिपूरक रजा किंवा इतर लाभ देण्याबाबतचे स्वतंत्र निर्देश सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने नंतर निर्गमित करण्यात येतील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अनिल हिरेखण)
**कुलसचिव**

**प्रत माहितीकरीता सविनय सादर:-**

1) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
2) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
3) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
4) मा. अधिष्ठाता(सर्व), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
5) मा. संचालक(सर्व), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

6) मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
7) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये गडचिरोली व चंद्रपुर जिल्हा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
8) मा. सर्व विभाग प्रमुख(पदव्युत्तर शै. विभाग व शिक्षकेत्तर विभाग) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
9) सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.
10) जनसपंर्क अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना उचीत कार्यवाहीस्तव.

(डॉ. हेमंत बारसागडे)
**उपकुलसचिव, आस्थापना**